राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या नियामक मंडळामध्ये सदस्य म्हणून समावेश करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः बैठक-१५२६/प्र.क्र.८०/असंसर्ग-२

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
१० वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ००१
दिनांक: १० ऑगस्ट ,२०२६

वाचा -

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. राரसे-२०१५/ प्र.क्र. ५३८/ आरोग्य -५, दि.२० सप्टेंबर, २०१६
२) राज्य रक्त संक्रमण परिषद, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दि. १५ एप्रिल, २०१९ रोजी झालेल्या नियामक मंडळाच्या ४० व्या बैठकीचे इतिवृत्त
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. रारसे-२०१५/ प्र.क्र. ५३८/ आरोग्य -५, दि.१६ ऑगस्ट, २०१९.
४) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. रारसे-२०१५/ प्र.क्र. ५३८/ आरोग्य -५, दि.३१ ऑगस्ट, २०१९.
५) राज्य रक्त संक्रमण परिषद महाराष्ट्र यांच्या दि. १३ जुलै,२०२६ रोजी झालेल्या नियामक मंडळाच्या ५५ व्या बैठकीचे इतिवृत्त.
६) संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय यांचे कार्यालयीन आदेश दि. २७.०७.२०२६
७) राज्य रक्त संक्रमण परिषदेचे पत्र दि. २८.०७.२०२६

प्रस्तावना -

वरील वाचा क्र. ३ व ४ येथील शासन निर्णय दि. १६ ऑगस्ट, २०१९ आणि दि. ३१ ऑगस्ट, २०१९ अन्वये राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या सदस्यांची यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या नियामक मंडळाची ५५ वी बैठक दि. १३.०७.२०२६ रोजी पार पडली. सदर बैठकीमध्ये राज्य रक्त संक्रमण परिषदेचा विषय सांभाळणारे सह/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचा समावेश नियामक मंडळामध्ये करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. तसेच राज्य रक्त संक्रमण परिषदेचे कामकाज अधिक सुदृढ व सक्षम होण्याच्या

दृष्टिकोनातून वाचा क्र. ६ येथील आदेशान्वये सहसंचालक (रुग्णालये), आरोग्य सेवा आयुक्तालय यांच्याकडे पदभार देण्यात आला आहे. त्यामुळे सहसंचालक (रुग्णालये) यांचा समावेश देखील राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या नियामक मंडळामध्ये करण्याची विनंती वाचा क्र. ७ येथील पत्रान्वये राज्य रक्त संक्रमण परिषदेने केली आहे.

त्या अनुषंगाने सह/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई आणि सहसंचालक (रुग्णालये), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांचा समावेश राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या नियामक मंडळामध्ये करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या नियामक मंडळामध्ये खालील प्रमाणे दोन सदस्यांचा समावेश करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१)	सह /उप सचिव , सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.	सदस्य
२)	सह संचालक (रुग्णालये), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई	सदस्य

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१०१२५२२४८२१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by NILESH N THAKUR
Date: 2026.08.10 15:46:14 +05'30'

(निलेश ठाकुर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (सा.आ.) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.

२. मा. राज्यमंत्री (सा.आ.) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.

३. मा. प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई.
४. मा. सचिव - २ यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई
५. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
६. आयुक्त, शहरी आरोग्य, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
७. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई/पुणे.
८. सहसचिव/ उपसचिव सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई.
९. सह संचालक (रुग्णालये), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
१०. सहाय्यक संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई.
११. समितीतील सर्व सदस्य (राज्य रक्त संक्रमण परिषदेमार्फत)
१२. निवडनस्ती (असंसर्गजन्य आजार-२)